# कांदे चोर

राजा मंगळवेढेकर

# कांदे चोर

राजा मंगळवेढेकर

प्रकाशन विभाग
माहिती आणि प्रसारण मंत्रालय
भारत सरकार

March 1992 Phalgun 1913

© प्रकाशन विभाग

**मूल्य : रु. १८.००**

प्रकाशक, प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार,
पटियाला हाऊस, नवी दिल्ली-१
मुखपृष्ठ - रेखाटने - हर्षा शाह, स्वाती जोशी.

प्रकाशन विभाग ● विक्री केन्द्र

- सुपर बझार, कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११० ००१.
- कॉमर्स हाऊस, करीमभॉय रोड, बेलार्ड पिअर, मुंबई-४०० ०३८.
- ८, एस्प्लनेड ईस्ट, कलकत्ता-७०० ००१.
- एल. एल. ए. ऑडिटोरियम, ७३६, अण्णामलाई, मद्रास-६०० ००२.
- बिहार स्टेट को ऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, अलोक राजपथ, पटणा-८०० ००४.
- प्रेस रोड, त्रिवेंद्रम-६९५ ००१.
- १०-बी, स्टेशन रोड, लखनौ-२२६ ००४.
- स्टेट अर्चालॉजिकल म्युझिअम बिल्डिंग, पब्लिक गार्डन, हैदराबाद-५०० ००४.

मुद्रक : मॉडर्न आर्टस अँड इंडस्ट्रिज, १५१ ए टू झेड इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई-४०० ०१३.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| डेबू | १ |
| नानू | १५ |
| कांदे चोर | १९ |
| सुरस | २३ |

# प्रकाशकीय

बालकुमारांच्या हाती ख्यातनाम लेखक श्री. राजा मंगलवेढेकर यांच्या कथांचा खजिना देताना आम्हाला आनंद होत आहे. श्री. मंगलवेढेकर यांची तुमच्याशी मासिकांतून केव्हाच गट्टी जमली आहे. त्यांचा मी अधिक परिचय तो काय देणार.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या प्रकाशन विभागातर्फे मुलांसाठी विविध भाषांमधे काही पुस्तकं प्रसिद्ध करण्याचं ठरविण्यात आलं. फारच कमी दिवसांत हे काम पूर्ण करायचं होतं. मराठी पुस्तकांच्या संपादनाची जबाबदारी आमच्या योजनेचे संपादक श्री नीतीन केळकर यांच्यावर सोपवली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हे पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवणं शक्य झालं. त्यांचेही आभार.

*डॉ. श्यामसिंह शशि*
संचालक

# डेबू

गावाचं नाव शेडगाव. आहे वऱ्हाडात. अमरावती जिल्ह्यात. हेच डेबूचं गाव. डेबू याच गावात जन्मला. नऊ, दहा वर्षांचा होईपर्यंत वाढला.

डेबूच्या बापाचं नाव होतं झिंगराजी. आईला म्हणत होते, सखुबाई. होते परीट. पण शेतीभाती करायचे. आपलं पोट भरायचे.

डेबूचा बाप होता देवभक्त. सटवाई, मरिआई, म्हसोबा, बिरोबा अशा सगळ्या देवांना भजायचा, पूजायचा. रोज देवाला भाजीभाकरीचा निवद दाखवायचा. अधूनमधून सणावाराला मोठा निवद पण करायचा. मग त्या दिवशी बकरं नाही तर कोंबडी कापायचा. त्याच्या रक्ताचा निवद खायचा आणि दारु प्यायचा.

होता होता देवाचं काय झालं, ठाऊक नाही, पण याला मात्र त्याची चटक लागली ! झिंगराजीला मग साधं जेवण चालेनासंच झालं. आवडेनासंच झालं. भाजीभाकरीत त्याला गोडी वाटंना. देवाचा मोठा निवद यालाच लागू लागला. रोज मांस आणि दारू. देवाच्या नावावर झिंगराजीच सोकून बसला. आज म्हसोबाला निवद, तर उद्या येताळाला निवद; एकदा मरिआईला निवद, तर एकदा जाखाईला निवद ...

झिंगराजी पक्का व्यसनी बनला. दारुच्या तारेतच राहू लागला. घरातच पडू लागला. कामावरचं ध्यान उडालं. पीकपाणी पार बुडालं. मांस - दारू अशी नडली. शेतजमीन घाण पडली. पैसाअडका संपून गेला. सखुबाईचा हात, गळा बुच्चा झाला. नांदतं घर एकदम बसलं. गरिबीनं झपाटून गेलं.

सात - आठ वर्षांचा डेबू सगळं बघत होता. त्याला कळत होतं की नव्हतं माहीत नाही. पण फरक मात्र जाणवत होता.

होता होता झिंगराजी आजारी पडला. बिछान्याला खिळून गेला. आजार वाढतच गेला. दवापाण्यालाही महाग झाला. आता कसं होईल ? काय होईल ? .... काळजीच्या भोवऱ्यात सापडला.

निरूपाय झाला, तेव्हा मावसभाऊ आला. सगळ्यांना आपल्या घरी घेऊन गेला. यातून आपण काही उठणारत नाही, असं त्याचं त्यालाच वाटू लागलं. मग एकदा तो सखुबाईला म्हणाला,



"सखू, मी तर चाललो. माझा कारभार आटपला. दारूपायी मी कंगाल झालो. जमीन गेली, डाग गेले, माझ्या संसाराचे कोळसे झाले. मरायला देखील दुसऱ्याच्या दारात येऊन पडलो. फार फार चुकी झाली. वागू नये तसा वागलो. आता मात्र एक सांगतो, देवपाटातले दगडगोटे काढ, सगळे देव गोळा कर आणि नदीनाल्यात फेकून दे ! आपल्या डेबूला त्याचा वारा लागू देऊ नकोस. त्याला त्यांच्यापासून लांब ठेव. बकरे खाऊ आणि दारू पिऊ देवापासून त्याला वाचव ..."

झिंगराजी मरून गेला. डेबू आपल्या आई बरोबर मामाच्या घरी आला. मूर्तिजापुराजवळ दापुरे नावाचं गाव आहे. त्या गावात मामा राहात होता. मामाची शेती होती, गुरंढोरं होती. पहिल्यापहिल्यांदा डेबू गुरंढोरं राखायचा. थोडा मोठा झाल्यावर मामाच्या शेतात औतही हाकायचा ...

डेबू आणखी थोडा मोठा झाला, तसं आईनं आणि मामानं त्याचं लगीन पण करून दिलं. डेबूजीला एक मुलगी पण झाली.

मुलीचं नाव ठेवायचं. बोकडाची कंदूरी आणि दारूचा बेत झालाच पाहिजे ! जातवाल्यांनी आग्रह धरला. पण डेबूजीनं त्याला नकार दिला. म्हणाला, "दारूनं आपलं पुष्कळ वाटोळं केलंय. घरादारांतून माणसांतून उठवलंय. आता तरी डोळं उघडूया आणि माणुसकीनं वागू या !"

दिवस - मास चालले होते. डेबूजी शेतात राबत होता. कष्टत होता. पण त्याचं मन आता वेगळ्याच गोष्टीत ओढलं गेलं होतं. आपल्या आजूबाजूच्या लोकांची दैना आणि गरिबी त्याला डाचू लागली होती. लोक तरी कसले ? अडाणी गोळे ! डोळे असून आंधळे ! देव - देवस्कीत बुडलेले. आंधळ्या श्रध्देत फसलेले, बुऱ्या चालीरीतीत गुंतलेले, वाईट रुढींत रुतलेले, जात - पात, शिवता - शिवत असल्या धर्मात कुजलेले ...

डेबूला हे बघून फार फार वाईट वाटे. दु:ख होई. डेबूही काही शिकला सवरलेला नव्हता. अक्षर ओळखही नव्हती. पण डोळे उघडे होते. कान उघडे होते आणि मनाचे दरवाजे पण सताड उघडे होते. बापाची दशा पाहिली होती. गरिबीची झळ अनुभवली होती.

शेत राखता राखता त्याच्या मनी यायचं "हे सगळं बदललं पाहिजे. वाईट काय, चांगलं काय लोकांना सांगितलं पाहिजे. त्यांना शिकवलं पाहिजे. अज्ञानाची जळमटं झाडली पाहिजेत. खऱ्या धर्माची वाट दाखविली पाहिजे. खऱ्या देवाचं दर्शन घडविलं पाहिजे ..."

मनाची तळमळ वाढत गेली. जनाची कळकळ बसू देईना.

डेबू उठला आणि घराकडं पाठ फिरवून निघून गेला. गावोगाव हिंडला. रानोमाळ भटकला. जनलोकांत

मिसळला, सगळा समाज न्याहाळला. सगळीकडं दिसली घाणच घाण ! घर घाण, देऊळ घाण, पाणवठा घाण. माणसं तर घाणच घाण ! आतून घाण, बाहेरून घाण ...

डेबूनं ठरवलं, आधी ही घाण घालवली पाहिजे. सगळं कसं स्वच्छ - निर्मळ केलं पाहिजे.

डेबूनं हातात झाडू घेतला. गावनूगाव झाडू लागला, गावनूगाव निर्मळ होऊ लागलं. लोक चकित झाले ! म्हणू लागले "कोण हा बाबा ? आपल्या गावात येतो काय आणि आपल्या गावातली घाण काढतो काय ?"

बाबाचा झाडू गावागावांतून फिरतच राहिला. सुरूवातीला लोक बघतच राहिले.

बाबा कसा होता ? फार उंच नाही, फार बुटका नाही. तांबूस गोरा रंग. उन्हानं रापलेली मुद्रा. दाढी वाढलेली. डोक्यावर केसांचं जंगल, पण डोळे मात्र विलक्षण लखलखीत ! तेजस्वी ! दुसऱ्याच्या मनाचा ठाव घेणारे ...

बरं बाबाचा पोषाख ? काय सांगावं ! कमरेला लुंगी, अंगात बंडी, बंडीला सतरा रंगाची सतरा ठिगळं. एका पायात, कुठं तरी सापडलेला एक कॅनव्हासचा लालसर जोडा, तर दुसऱ्या पायात कुठं तरी तिसरीकडंच मिळालेला, भोकं पडलेला हिरवा पायमोजा. एका कानात लोंबती कवडी, तर दुसऱ्या कानात तसेच लोंबणारे काचेचे रंगीत मणी. गळ्यात जानव्यासारखी घातलेली एक रबरी नळी. पायात घुंगरू. एका हातात काठी आणि हातात मडकं. हेच मडकं कामाच्या आणि उन्हाच्या वेळी डोक्यावर हॅट सारखं पालथं बसायचं. जेवायचं त्याच्यातच आणि पाणीदेखील प्यायचं त्यानंच ...

असं हे बाबाचं ध्यान पाहून लोक म्हणायला लागले, "गाडगेबाबा ! गाडगेबाबा !"

डेबू आता सगळ्यांचा गाडगेबाबा झाला. गाडगेबाबांच्या मागे सगळे लोक जमू लागले. गर्दी करू लागले. बाबा जत्रेत - यात्रेत जायचा. घाणीच्या ठिकाणी झाडू मारायाचा. गावाच्याबाहेर भलं पटांगण पाहून किर्तन करायचा.

बाबाचं कीर्तन म्हणजे एक आगळंवेगळं कीर्तनच होतं. या कीर्तनात बाबा शब्दांच्या झाडूनं लोकांच्या मनातली घाण काढायचा. फटके बसायचे, पण लोक हसत हसत झेलायचे. त्यांना ते पटायचे. ते बाबाच्या कीर्तनाला आणखी गर्दी करायचे.

बाबाचं कीर्तन भजनानं सुरू व्हायचं, "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ! ..."

बाबा सांगायचा आणि हजारो लोक टाळीच्या ठेक्यावर म्हणायचे. भजनानं सगळं वातावरण दुमदुमून

जायचं. बाबाच्या कीर्तनात अनेक विषय यायचे.

दगडधोंड्याच्या देवावर बाबाचा राग का ? तर तो माणसालाही दगडधोंडाच बनवितो ! बाबा कीर्तनात आपला अभंग म्हणायचे :

देव दगडाचा घडविला ।
पाथरवट त्याचा बाप झाला ॥
देव सोनियाचा केला ।
त्याचा सोनार बाप झाला ॥
देव मातीचा बनविला ।
बाप कुंभार त्याला झाला ॥
देव आहे अंतरात ।
जैसा हात तैशी मूर्त ॥

बाबाचं कीर्तन म्हणजे ऐकणाऱ्यांशी संवादच चालायचा.

बाबा विचारीत असत, ''गड्यांनो, देव देव करता देव कीती आहेत ?''

श्रोते एका आवाजात सांगत असत ''एक !''

बाबा मग विचारायचे, ''गावात खंडोबा हाय का !''

''हाय की !''

''मग देव किती झाले ?''

''दोन''

''गावात भैरोबा हाय का ?''

''हाय की !''

''मग देव किती झाले ?''

''तीन !''

''गावात मऱ्याई हाय का ?''

''हाय की !''

मग देव किती झालं ?''

''चार !''

''म्हसोबा हाय की नाही ?''

''हाय की !''

''मग देव किती झालं, सांगा ?''

''पाच !''

''येताळ ?''

''हाय की !''

''आता देव किती झालं ?''

''सहा !'' ....

आणखी अशीच देवांची मोजदाद व्हायची आणि बाबा म्हणायचे ''तुकाराम महाराज म्हणतात:

वेड लागले जगाला ।

देव म्हणती धोंड्याला ॥ ...''

मग त्यांचा आवडता गजर ....

गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥''

बाबा कीर्तनात सांगायचे ''मायबाप हो, देव तीर्थात न्हाई, रानावनात न्हाई, तो तुमच्यासमोर दरिद्रि नारायणाच्या रूपात समक्ष उभा हाये. त्याचीच जिवा भावाले सेवा करा.''

''बाप हो ! आन् एक गोष्ट ऐका ! बामन कोन केले ?''

''देवानं !''

''महार, मांग, चांभार कोन केले ?''

''देवानं !''

''सगळं देवानं केले, मग ही शिवाशिव कुठून आली म्हनावं ?''

आणि मग बाबा सांगत, ''आपले हिंदुस्थानले मोठा एक डाग आहे. तो डाग धुवायचा प्रेयत्न करा. तो डाग कोणता ? शिवशीला !''

''तू कोन ? अशी जो जात पुसतो त्याच्या सारखाच तो आहे का नाही ?''

''होय !''

''याले चार हात अन् त्याले दीड हात आहे का ? बोला.''

''नाही.''

''याले चार डोळे आहेत, याले दोनच आहेत; असं आहे का ?''

''नाही.''

''मग तू कोन ? का पुसता ? कोणी तूम्हाले जात विचारील, तू कोन ? तर म्हणावं मी मानूस! काय म्हणावं ?''

''मानूस !''

बाबा अशी माणसालाच आपली ओळख करून देत असत. कधी कधी कीर्तनात बाबा लोकांना विचारत असत, ''शिरीखंड चांगलं का बकरं चांगलं ?''

''शिरीखंड''

''बासुंदी चांगली की बकरं चांगलं ?''

''बासुंदी.''

''इथं असं बोलता आणि घरी जाऊन बकऱ्याचं मास खाता. काय म्हणावं तुमाला ?''

लोक खो खो हसायचे.

''गुजराती आन् मारवाडी देवाला जातात, ते कवा देवाला बकरं देतात का ?''

''नाही.''

''मग देव त्यांना कसा पावतो ? पावतो का नाही ?''

''पावतो.''

''आन् मग तुम्हालाच बकरं आन् कोंबडं मागतो व्हय ?''

बाबाचा फटका खाऊन पुन्हा लोक खो खो हसायचे.

''अरे, असा कसा तुमचा देव ।

''घेतो बकऱ्याचा जीव ॥''...

बाबा असं लोकांना हसवीत हसवीत, फटकारीत शिकवत असत. लोकांची गरीबी, अडाणीपणा, आळशीपणा यावरही ते कोरडे ओढत असत.

''हे लोक का गरिबीत राहिले ? एक तर याहिले नाही विद्या. काय नाही ?''

''विद्या !''

''ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी ...''

''चालेल !''

''विद्या मोठं धन आहे. यातलेच मानसं बोरीबंदरच्या ठेसनवर पोते उचलतात. ते मानसं अन् हे कोन ? हे काही बैल नाहीत ना ? कोन आहेत ?''

''मानसं !''

डेबूचा गाडगेबाबा झाला आणि बाबा अखेरपर्यंत माणसांना माणूस व्हायला शिकवीत राहिला !

● ● ●

# रेवू

रेवू हे त्याचं नाव. सरसवणी हे त्याचं गाव. सरसवणी आहे गुजरात राज्यात. खेडा जिल्ह्यात.
रेवूचे वडील शिवरामदादा व्यास. हे होते गोर. गोर म्हणजे भिक्षुक. लोकांची लग्नकार्ये लावायचे. धार्मिक काम करायचे. व्यासांचा तो व्यवसायच होता. पण रेवूनं ही असली गोरकी काही केली नाही. कारण गोरकीतल्या कर्मकांडावर आणि अंधश्रध्देवर रेवूचा मुळीच विश्वास नव्हता.

रेवूचं शाळेतलं शिक्षण तसं बेताचंच झालं होतं, पण त्याच्या तरूणाईत त्याला एक वेगळीच शाळा भेटली होती. ती म्हणजे तुरुंग !

म्हणजे रेवू काही तसा चोर - दरोडेखोर नव्हता. पण चोऱ्यामाऱ्या करणाऱ्यांच्या संगतीत मात्र तो वाढला होता. ही मंडळीदेखील त्याला तुरुंगातच भेटली होती.

म्हणजे त्याचं असं झालं होतं की, रेवूच्या ऐन तारूण्यात देशात स्वातंत्र्यासाठी लढाई चाललेली होती. देशाचं स्वातंत्र्य बळकावणाऱ्या इंग्रजाला देशाबाहेर घालवून द्यायचं होतं. या लढाईच्या कामात रेवू गुंतलेला होता.

इंग्रज सरकार नाना तऱ्हेने देशाची लूट करीत होतं. नाना तऱ्हेचे जाचक कायदे बनवीत होतं. लोकांचं सत्त्व काढून त्यांना निस्तेज बनवीत होतं. टिळकांनी, गांधींनी या कायद्याच्या विरुध्द आवाज उठवला होता. सगळा देश खडबडून जागा झाला होता. आधी टिळकांच्या आणि त्यांच्या मागून गांधींच्या पाठीशी उभा राहिला होता. त्यात रेवू सामील झाला होता.

गुजरातमधल्या गरीब शेतकऱ्यांवर इंग्रज सरकारनं अन्याय चालवला होता. त्याविरुध्द गांधींचे एक शिष्य वल्लभभाई पटेल दंड थोपटून उभे राहिले होते. बारडोलीला त्यांनी सरकारविरूध्द सत्याग्रहाची लढाईच सुरु केली होती. साराबंदीची घोषणा केली होती. बारडोलीच्या परिसरातले हजारो शेतकरी वल्लभभाईंच्या पाठीशी उभे ठाकले होते. 'शेतीच्या साऱ्यापोटी सरकारला एक दीडकीही द्यायची नाही !' असं त्यांनी ठरवलं होतं. वल्लभभाई पटेलांना या लढाईत शेतकऱ्यांनी सरदारच बनवून टाकलं होतं. बारडोलीच्या लढ्यापासून वल्लभभाईंना सारा देश 'सरदार' म्हणूनच ओळखू लागला होता !

रेवूनं या लढ्यात सरदारांना खूपच मदत केली होती. इतकी की, त्याला सरदारांचा उजवा हात म्हणूनच लोक ओळखू लागले होते. रेवू त्या वेळी खेड्यापाड्यांतून फिरला. शेतकऱ्यांशी बोलला. त्यांना समजावून सांगितलं. त्यांच्यात धैर्य निर्माण केलं आणि इंग्रजांशी टक्कर द्यायला तयार केलं !

आता इतकं करणाऱ्या माणसाला सरकार तरी बाहेर कसं ठेवणार ? सरकारनं रेवूला पकडला आणि तुरुंगात टाकलं. म्हणून रेवू तुरुंगात गेला होता !

तुरुंगात लढाईतली पुष्कळच माणसं आलेली होती. ती गांधींची माणसं होती. त्यागी होती. चारित्र्यवान होती. शिकलेली होती. देशासाठी काही ना काही काम करणारी होती. त्यांचा सहवास रेवूला घडला. रेवू नकळत त्यांच्यापासून पुष्कळ पुष्कळ शिकला. टिळकांचं 'गीतारहस्य', सातवळेकरांची वेदांवरली पुस्तकं, इंग्लंड, फ्रान्स, इटली इत्यादी देशांचे इतिहास, शिवाजी महाराजांचं चरित्र ... असं कितीतरी वाचनही त्यानं तिथं केलं. तिथं त्यानं एक नियमच केला होता, रोज गीतेचे दोन श्लोक पाठ करायचे आणि मगच जेवायचं. या नियमामुळं सगळी गीता रेवूला तोंडपाठ झाली होती !

तुरुंगात इतर कैदीही होतेच. चोरी, दरोडेखोरी, खून मारामारी असे गुन्हे करून आलेली बरीच मंडळी होती. रेवू त्यांच्यात जायचा. त्यांच्याशी मिसळायचा. मन मोकळेपणाने बोलायचा. कुणी काय केले, कुणी काय केलं, हे त्यांच्याकडून समजून घ्यायचा आणि 'असे गुन्हे करु नका, चांगली माणसं बना, सुखानं उद्योग करा, मुलाबाळांना चांगलं शिकवा, सुखानं चांगलं जीवन जगा', असं तो त्यांना सांगायचा.

पण या मंडळींशी बोलता बोलता आणि त्यांच्या कडून ऐकता ऐकता रेवूच्या लक्षात येऊन चुकलं होतं की, गुन्हेगारांना नुसता उपदेश करुन भागणार नाही, तर गुन्हा करावाच लागू नये, यासाठी कामधंद्याची काहीतरी तरतूद केली पाहिजे. माणूस बहुधा पैशाच्या अडचणीतूनच गुन्हा करीत असतो. लहान लहान गुन्हे करीत मग तो पटाईत गुन्हेगार बनत असतो. तुरुंगातून सुटल्यावर रेवूनं आपल्या अनेक कामांत हे एक नवीनच काम हाती घेतलं. ज्या जमाती गुन्हेगार म्हणून ठरवण्यात आल्या होत्या, त्यांना माणूस बनवण्याच्या प्रयत्नाला तो लागला.

ज्या जमाती गुन्हेगार ठरवलेल्या आहेत त्यांच्यामागं हजेरी देण्याची कटकट असे. त्यासाठी रोज पोलीस ठाण्यावर जमातीतल्या स्त्री-पुरुषांना जावं लागत असे. स्त्रियांनी घुंगट घेतलेला असे. 'हजर' म्हणताना आवाजात संशय वाटला तर हजेरी घेणारा बाबू घुंगट बाजूला करुन तिचं तोंड न्याहाळायचा. असा संशय तर तो मुद्दामच घ्यायचा. त्या स्त्रिला लज्जेनं चूर व्हायच्या माणसानं माणसावर दाखवलेला केवढा हा अविश्वास ! आणि केवढी पापबुध्दी !

रेवूनं पुष्कळ खटपट केली आणि या जमातींच्या मागची हजेरीची अपमानास्पद पध्दत करायला लावली.

जमातीतल्या मंडळींनाही भलाईनं वागण्याचं शिक्षण दिलं.

रेवू त्यांच्या अडीअडचणी दूर करीत असे आणि हे सगळं मोठ्या मायेनं आणि ममतेनं करत असे. रेवूच्या या निर्मळ सेवेनं गुन्हेगारांचं मनही विरघळले. त्यांना रेवूबद्दल आदरभाव वाटू लागला. हा माणूस आपला हितकर्ता आहे, याची खूण त्यांना पटली. म्हणून ते रेवूला 'महाराज' असंच म्हणू लागले !

सुनसर गावच्या ठाकूर मंडळीना एकदा महाराज सांगत होते, ''गड्यांनो, चोरी करणं सोडून द्या.''

''चोरी सोडा ? आन् मग खायाचं काय ?'' एकानं सवाल केला. महाराज म्हणाले, ''मेहनत - मजुरी करा.''

''महाराज, अवो, आमाला कोन जवळ देखील येऊ देत नाहीत, मग मजुरी कोण देणार ?''

''तुमची तयारी असेल तर मी व्यवस्था करतो. आहे सगळ्यांची तयारी ?''

''हां हां, आहे !'' सगळे म्हणाले.

पण तेवढ्यात एक आवाज उमटला ''महाराज, तुमी मजुरी द्याल, आमी मजुरी जोडू, पण आमाला मग पोरगी कोन देणार ? आमची लग्नं कशी होणार ?'' ''त्याचीही नंतर खटपट करू. आधी मजुरीचं बघू.'' महाराज म्हणाले. गुन्हेगार जमातीत जो जास्त चोऱ्या करू शकतो, सराईतपणानं दरवडे घालू शकतो. त्यालाच 'नवरा' म्हणून निवडलं जात असे. त्यांच्या दृष्टीनं मोठा आणि सराईत गुन्हा म्हणजेच पुरुषार्थ ! पराक्रमी !

गावात एक लहानसं तळं तर आहेच. तेच या लोकांकडून खोदून घ्यावं म्हणजे या लोकांना काम मिळेल, शिवाय गावाला पाणीही मिळेल ... महाराजांनी विचार केला. ते कामाला लागले. तळं खोदण्यासाठी आवश्यक ती तरतूद अनेकांच्या साहाय्यानं झाली. महाराजांच्या शब्दाला अनेकांकडं मान होता. महाराजांनी तो आपल्या निर्मळ सेवेतून कमावलेला होता.

तळं खोदून झालं. पावसाळ्यात पाण्यानं भरून गेलं. महाराज ठाकुरांना म्हणाले, '' गड्यांनो, तुम्ही मेहनत तर खूप करू शकता. तुम्हाला चांगल्या जमीनीही आहेत. मग शेती का नाही करत ?''

''महाराज, जमीन हाय, पण अवजारं न्हाईत. त्याबिगर शेती कशी होनार ?'' एकानं अडचण सांगितली.

''मी तुम्हाला अवजारं देतो. कराल शेती ?''

"हां हां, करू की !" सगळे म्हणाले महाराजांनी पुन्हा पायपीट केली. अनेकांकडे गेले. अवजारं आणून दिली. ...

ठाकूरांनी जमिनीत घाम गाळला. जमीन हिरवीगार झाली ! धान्यांच्या कणसांनी डोलू लागली. जोडीला गाई - म्हशी आल्या. दुधदुभतं मिळू लागलं. ठाकूर मंडळींचं जीवनच पार बदलून गेलं !

त्या वेळेच्या बडोद्याच्या गायकवाड सरकारनं सुनसरला एक पोलिस ठाणं ठेवलं होतं, पण त्यामुळं सुनसरच्या लोकजीवनात काहीच बदल झालेला नव्हता, परंतु महाराजांच्या जिव्हाळ्यामुळे, केलेल्या सेवेनं मात्र अवघ्या दीड - दोन वर्षांतच सगळा कायापालट घडून आला !

गुन्हेगारांना माणसांत आणण्यासाठी महाराज गुजरातच्या खेड्यापाड्यांतून, रानावनांतूनल काट्याकुट्यांतून अनवाणी फिरले !

त्यांच असं झालं. एकदा एका ठिकाणी पायताण बाहेर ठेवून ते आत गेले. काम झाल्यावर बाहेर येऊन पाहतात तो पायताण गायब ! महाराज म्हणाले, "बरं झालं ! एका कटकटीतून सुटलो !" ... आणि तेव्हापासून महाराजांनी अनवाणी चालायला सुरुवात केली. पायांत पायताण नाही. हातात काठी नाही.

काठीचीही गोष्ट अशीच : महाराज एकदा वाटेनं चालले होते. मागून बैलगाडी आली. गाडीवानानं ओरडून बाजूला व्हायला सांगितलं. पण महाराज आपल्याच नादात होते. त्यांना ऐकू गेलं नाही. तेव्हा गाडीवानानं हातातल्या चाबकानं फटकारलं. त्यासरशी महाराजही संतापले. हातातली काठी उगारली, पण हाणली नाही उगारलेली काठी तशीच खाली घेतली, गाडीवानाची क्षमा मागितली. गांधीजींनी दिलेली अहिंसेच्या आणि शांतीच्या शिकवणुकीची त्यांना आठवण झाली होती. हिंसेपासून त्यांनी स्वत:ला लगेच सावरलं होतं. आणि मग तेव्हापासून 'हिंसेची प्रेरणा देणारी काठीच नको', म्हणून महाराजांनी काठीही टाकून दिली !

हातानं कातलेल्या सुताचा ढोपराएवढा पंचा, अंगात कोपरी आणि डोक्यावर गांधी टोपी. कधी खांद्यावर जाडी भरडी घोंगडी. बस, एवढाच महाराजांचा पोशाख असे. लोटा आणि रस्सी एवढंच सामान. एक वेळ खिचडी एवढीच त्यांची गरज, तीही मिळाली तर ठीक, नाही मिळाली तरीही ठिकच !

महाराज गावोगांव हिंडत असत. लोकांची सेवा करीत असत. कुठं कॉलरा झाला तर जीव धोक्यात घालून आजाऱ्यांची सुश्रुषा करीत असत. बुडत्याला वाचवत असत. स्वावलंबन, स्वदेशी, स्वच्छता आणि स्वराज्य हाच त्यांनी आपला धर्म मानला होता. माणसा माणसांत ते भेद करीत नसत. जात - पात - धर्म - पंथ असल्या संकुचित गोष्टींना ते थारा देत नसत.

सतत सगळीकडं हिंडणारे महाराज पावसाळ्यात श्रावणाच्या महिन्यात मात्र एकाच ठिकाणी राहात असत.

या महिन्याभरात वर्षभराच्या कपड्यांना पुरेल एवढे सूत कातीत. असत. कातता कातता गाववाल्यांना रामायणही सांगत असत.

एका श्रावणात छापरा गावाजवळच्या शेतातच महाराजांनी मुक्काम ठोकला होता. सूतकताई आणि वाचण्याचा कार्यक्रम चालला होता. एके दिवशी एका शेतकऱ्यांनं विचारलं, ''महाराज आपण जसं रामायण वाचता तसं मला वाचायला येईल का ?''

''हो हो, जरूर. का नाही येणार ?''

''कसं येईल ?''

''हे बघ, तू मला केव्हापासून ओळखतोस ?''

''महाराज, हे काय विचारणं झालं ?, मी तर आपल्याला पहिल्यापासून ओळखू लागलो.''

''होय की नाही ? मला जसं ओळखायला लागलास तसंच तुझी गुरंढोरं, शेतं, शेजारीपाजारी यांनाही ओळखायला लागला असशील ?''

होय, होय.''

''बस, मग अशाच रीतीने हे लिहिलेलंही ओळखायचं, पाटी - पेन्सिल आण म्हणजे मी तुला शिकवीन.''

यावर दोन - चार दिवस गेले, पण पाटी - पेन्सिल आली नाही. शेतकरी काही तरी सबब सांगायचा. महाराजांनी ओळखलं की, पाटी - पेन्सिल आणण्याइतके पैसे त्याच्याकडे नाहीत. मग एके दिवशी महाराजांनी जमिनीवरची माती साफ केली. शेतकऱ्याला बोलावलं आणि मातीवर 'क' हे अक्षर काढून दाखवलं. म्हणाले, ''याला 'क' म्हणून ओळखायचं.''

''होय कळलं महाराज.'' शेतकरी आनंदात म्हणाला. दुसरे दिवशी सकाळी महाराज बघतात, तर शेतात जिकडे तिकडे त्यांना 'क' च 'क' दिसले !

अशा रीतीनं महाराजांनी त्याला अक्षरओळख करून दिली.

पुढं एकदा स्वातंत्र्याच्या चळवळीत तो शेतकरी महाराजांना तुरुंगात दिसला. तो काही तरी वाचत

होता. महाराजांनी विचारलं ''काय वाचतो आहेस ?''

शेतकरी हात जोडून म्हणाला, ''महाराज, आपल्या कृपेनं रोज मी रामायण वाचतो,''

देश स्वतंत्र झाला, स्वराज्य आलं. गांधीजी गेले. महाराज आपलं काम करीतच राहिले. विनोबांच्या भूदान –— ग्रामदानाच्या कामात गढून गेले. सगळ्या गुजरातचेच ते 'महाराज' बनले ! महाराज म्हणजे 'रविशंकर महाराज' म्हणूनच लोकं त्यांना ओळखू लागले. महाराजांना आयुष्यही खूप लाभलं. शंभराहून अधिक वर्षं ते जगले. सेवेतच जगले आणि सेवेतच गेले. महाराज म्हणजे मूर्तिमंत सेवामूर्तीच होते !

● ● ●

# नानू

निसर्ग रमणीय केरळ !

तिरूवांकूर हे तिथलं मोठं शहरं !

तिरुवांकूरपासून नऊ - दहा किलोमीटरवर एक लहानसं गाव. चेम्पपंती हे त्याचं नाव. या गावात नानूचा जन्म झाला. त्याला झाली आता शंभराच्यावर तीस - चाळीस वर्षे. नानूच्या वडिलांचं नाव होतं मातन आणि आईचं नाव होते कुही. जात होती इजवा. अछूत. अस्पृश्य. घरची अत्यंत गरिबी. नानूचं बालपण फार हालात आणि कष्टात गेलं. नानू हूड, पण फार हुशार ! गावातली मुलं त्याला जवळ करायची नाहीत. खेळायला घ्यायची नाहीत "लांब हो, लांब हो, शिवशील , विटाळ होईल ...." असं म्हणायची. मुलांनाच नाही, तर गावच्या विहिरीला शिवायचं नाही. देवळात जायचं नाही, दुकानात शिरायचं नाही .... सगळीकडे "शिवशील शिवशील, लांब हो लांब हो ...." असंच ऐकून घ्यावं लागायचं सगळ्यांनी डोळे वटारून रागानं, तिरस्कारानं पाहायचं. हिडीस फिडीस करायचे. कमी लेखायचं ..... का म्हणून ? नानूला कळायचं नाही. कुणाला घरी विचारले तर सांगायचें, "आपण अस्पृश्य आहोत, गरीब आहोत." "पण माणूस आहोत ना ?" नानू विचारायचा.

नानू विचार करत राहायचा. तो आपल्या गावात किंवा तिरुवांकूरसारख्या गावात सगळीकडं पाहायचा. नायर जातीच्या माणसानं ब्राह्मणाशी बोलताना पन्नास पावलं अंतर ठेवूनच उभं राहून बोललं पाहिजे. इजवा जातीच्या माणसानं छत्तीस पावलं लांब उभं राहून बोललं पाहिजे आणि पुलयन जातीच्या माणसानं शहाण्णव पावलं लांब उभं राहून बोललं पाहिजे .... अशी तिथली रीत होती. अस्पृश्यांनी ती मोडली तर ब्राह्मण भ्रष्ट व्हायचा आणि अस्पृश्याला मार पडायचा.

पूरड वन्नन जातीच्या लोकांना तर रस्त्यानं जाताना आपलं तोंड ब्राह्मणांना किंवा वरिष्ठ जातीच्या लोकांना दिसणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागत असे. अस्पृश्यांना गावात राहणे कठीणच ! गावकुसाच्या बाहेर त्यांच्या झोपड्या. गावातल्या वरिष्ठांची या कनिष्ठांनी गुलामासारखी कामं करायचीत आणि ते देतील त्या शिळ्या पाकळ्या तुकड्यावर जगायचं ....

नानू हे सगळं पाहत होता. अनुभवत होता. त्यानं घरच्या घरी आपल्या काकांकडून पाठ गिरवायला सुरुवात केली. नानूचा काका कोण जाणे, पण शिकला सवरलेला होता आणि त्याला संस्कृतही चांगले

येत होतं. नानू काकांकडून संस्कृतही चांगलं शिकला. त्यानं आयुर्वेद आणि ज्योतिषशास्त्र यांचंही अध्ययन केलं.

मग त्यानंच एक शाळा काढली. तो शिक्षक झाला. शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना शिकवू लागला. शिक्षणाचं महत्त्व नानूला उमगलं होतं. अस्पृश्यता घालवायची असेल. शिकलंच पाहिजे, अज्ञान घालवलंच पाहिजे.

नानू असा शिकला. शिक्षक बनला. पण तेवढ्यात त्याला समाधान वाटेना. ' काही तरी केलं पाहिजे. वेगळ पाहिलं पाहिजे' असं त्याला वाटू लागलं. नानू एके दिवशी न सांगतासवरता कुठं तरी अज्ञान ठिकाणी गेला. कितीतरी वर्षे त्याचा ठावठिकाणाच नव्हता.

या अवधीत त्यानं खूप भटकंती केली. सगळ केरळ, तामिळनाडू पायाखाली घातला. असंच भारतभर फिरावं असा त्याचा विचार होता.

तामिळनाडूत फिरत असताना एके ठिकाणी अय्याऊ नावाचा एक साधू-सत्पुरुष त्याला भेटला. नानूनं त्याच्या जवळ योगाभ्यास केला. मरुत्व नावाच्या पहाडावर जाऊन कठोर योगसाधना केली. तिथं असताना तिथल्या पशुपक्ष्यांशी त्याची मैत्री जमली, इतकी की त्यांची भाषादेखील नानूला समजू लागली.

पुढच्या भ्रमंतीत अशीच कोणी एक योगिनी नानूला भेटली. तिनं नानूला सांगितलं, ''तुझं पुढचं सगळं आयुष्य दलितांच्यासाठी खर्च कर !''

नानू भटकंतीत सगळीकडंच दलितांची दयनीय स्थिती पाहात होता. त्याचं अंत:करण करुणेनं भरून गेलं होतं. म्हणून त्यानंही ठरवलं, आता आपलं पुढचं जीवन माणसांनीच टाकलेल्या माणसांकरिता झिजवायचं घर-प्रपंच मांडायचा नाही.

नानू गावोगाव जाऊ लागला. दलितांना उठवू लागला. त्यांना शिकवू लागला. त्यांच्यातल्या माणसाला जागवू लागला. नानू सांगायचा:

''कोणाला जात विचारू नका<br>
''कोणाला जात सांगू नका<br>
''कोणाच्या जातीचा उल्लेखसुध्दा करू नका.<br>
''जातीचा विचारच सोडा !<br>
''माणुसकीनं माणसाला जोडा !<br>
''माणसाचा धर्म एकच आहे.

"माणसाचा देव एकच आहे.
"माणसाची जात एकच आहे
"माणसाची माणुसकी!"

नानूनं अशी शिकवण लोकांना द्यायला धुमधडाक्यानं सुरुवात केली. नानू नुसतं सांगायचा नाही, तर करूनही दाखवयाचा. अरूविष्णुरम् गावची गोष्ट. तिथल्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. देवाच्या लेकरांना देवाला भेटता येत नव्हतं. नानूनं तिथं एक शिवमंदिरच उभारलं! अस्पृश्यांना देव भेटवला!

नानू समाज - सुधारण्याच्या कामास लागला. तो लोकांना सांगायचा :

"ताडी दारू पिऊ नका
"अमंगल अस्वच्छ राहू नका
"अंधश्रध्दा बाळगू नका
"कोणाला हीन, दीन, क्षुद्र, नीच समजू नका
"सगळी माणसं सारखीच आहेत."

केरळात गावोगाव नानूचे आश्रम सुरू झाले. त्याची सुधारणा केंद्रच झाली! नानूचं नाव केरळमधल्या माणसा माणसांपर्यंत पोचलं. त्याचं काम गावागावापर्यंत गेलं. नानूला लोक आता 'नारायण गुरू' असें मोठ्या भक्तीने आणि आदरानं म्हणू लागले.

केरळच्या दौऱ्यावर असताना गांधीजींच्या कानी नारायण गुरुची कीर्ती गेली. गांधीजी नारायण गुरुला त्यांच्या आश्रमात जाऊन भेटले. एकदा रवींद्रनाथही मुद्दाम गेले. अनेक थोरामोठ्यांची दृष्टी नारायण गुरूंच्या कार्याकडे वळली.

लोकांच्या मनात नारायण गुरूंच्याबद्दल एवढा भक्तिभाव आणि आदर की, एखाद्या चांगल्या विधायक कामाविषयी सरकारी फतव्याला ते जुमानायचे नाहीत, पण तेच नारायण गुरुंनी सांगितलं की मग मात्र मानायचे !

अस्पृश्यता निवारण्याचं आणि समाज सुधारण्याचं काम नारायण गुरुंनी चाळीस वर्षे केलं. १९२६ साली नारायण गुरूंचं निधन झालं.

नारायण गुरू गेले, पण निसर्गसुंदर केरळातली माणसांनीच निर्माण केलेली कुरुपता घालवण्याचा प्रयत्न करून गेले. माणसाचं जीवनही सृष्टीसारखच निर्मळ, सुंदर, सदाहरित प्रसन्न व्हावं, यासाठी ते झटले, झगडले. आजही केरळ मधल्या मल्याळी माणसांच्या मनात नारायण गुरुंना मोठ्या श्रध्देचे स्थान आहे!



# कांदे चोर

आपल्या शेजारी गुजरात आहे. गुजरातमध्ये खेडा नावाचा जिल्हा आहे. एका वर्षी पावसाळ्यात तिथं खूप खूप पाऊस पडला. शेतीभाती वाहून गेली. धान्यधुन्य सडून गेलं. गुडघा गुडघा चिखल, सगळीकडे दलदल झाली. ओला दुष्काळ पडला. माणसांना धान्य नाही, गुरांना चारा नाही, हलाखीचे दिवस आले. माणसांना, गुरांना उपासमार घडू लागली. भुकेजून रडू लागली. अशी आकाशाची कुऱ्हाड कोसळलेली. तशात सरकारची जुलमी सत्ता बळावलेली.

सुमारे सत्तर वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळी सरकार होतं परकं. इंग्रजांचं. देश होता गुलामीत. इंग्रज आले होते लुटायला. त्यांना या देशातल्या गोरगरीबांच्या दुःखाची, हालअपेष्टांची कणव कशाला येईल ?

खेड जिल्ह्यात गुरा - माणसांची ओल्या दुष्काळानं ऊपासमार चालली शेती. पण तरीही सरकारनं शेतीवरील सारापट्टी लादलेलीच होती. कडक वसुली सरू ठेवली होती. त्यासाठी घरादारांवर जप्ती, धाक-जबरदस्ती ... गांजलेल्या लोकांचा छळ चालूच होता.

काही शहाण्यासुत्यांनी सरकारकडं दयेची भीक मागितली होती. सारामाफी मिळावी म्हणून अर्ज-विनंती केली होती. पण निर्दय सरकारनं त्याची दखलही घेतली नव्हती. अर्जविनंतीला केराची टोपली दाखवली होती. वसुलीची दडपशाही चालूच ठेवली होती. गरिबांची भांडीकुंडी बाहेर काढली जात होती. दावणीची गुरंढोरं विक्रीला नेली जात होती. अस्मानी आणि सुलतानी दोन्हीकडच्या कोपानं गोरगरीब भरडून निघत होते. हैराण झाले होते. कुणी त्राताच नाही. कुठं आधार नाही, अशी त्यांची केविलवाणी स्थिती झाली होती.

पण एकाला त्यांची ही स्थिती पाहवली नाही. त्यांचं दुःख देखवलं नाही. त्यांच्या दुःखानं हा दुःखी झाला. त्यांच्या कष्टानं हा कष्टी झाला. याच्या हृदयाला करुणेचा पाझर फुटला. हा ताठ मानेनं जुलमी सरकारशी झुंज द्यायला उभा ठाकला. खेडा जिल्हाभर, गावागावांतून वस्तीवस्तींतून आणि झोपडी झोपडीतून हा गेला. गांजलेल्या, पीडलेल्या गोरगरीब शेतकऱ्यांना यानं पोटाशी धरलं. मायेनं कुरवाळलं. पाठीवरत थाप मारून धीर दिला. नव्या बळानं त्या सगळ्यांना उभं केलं. सरकारला ठामपणे सांगितलं, "सारा माफ करा, नाहीतर एक पै देखील मिळणार नाही."

सरकारचे अधिकारी वसुलीला जायचे, सरकारी अधिकारी गावात आले की, जे शेतकरी त्यांच्या

पायाशी लोळण घेत होते, आपण उपाशी राहून त्यांना कोंबडी-बाटली पुरवीत होते, तेच शेतकरी आता त्यांच्यापुढे ताठ मानेने उभे ठाकू लागले होते. त्यांची कसलीच विचारपूस करीत नव्हते. त्यांना आपल्या चीजवस्तूला हातही लावू देत नव्हते. एवढी निर्भयता आणि ताकद दुबळ्या शेतकऱ्यांच्या ठायी त्या कोणा एकानं थोडक्याच दिवसांत निर्माण केली होती.

त्या कोणा एकाचं नाव होतं पंड्या ! पंड्याजी तसे साधेसुधे नव्हते. चांगले खमके होते. स्वभावानं नीट, पण तेवढेच धीट ! मनीमानसी कणव असणारे, पण कर्तव्याला न चुकणारे ! पंड्याजी स्वत:च कर्तव्यदक्ष आणि धीट असल्यामुळे ते गरीब शेतकऱ्यांनाही धीट बनवू शकले !

पंड्याजींच्या धीटपणाची आणि कर्तव्यदक्षतेची एक आठवण सांगतात: पंड्याजी होते बडोद्याच्या सयाजीराव महाराजांच्या चाकरीत. संस्थानातील दुधाचा कारभार त्यांच्याकडं सोपविला होता. सयाजीराव महाराजांनी मोठ्या गोशाळा राखल्या होत्या. नामांकित गायी कुठून कुठून आणून पाळल्या होत्या. त्यांच्यावर देखभाल करायला नेमणूक केली होती पंड्याजींची.

एके दिवशी पंड्याजींच्या हाती हुकुमाचा कागद पडला. लिहिलह होतं - 'इंग्लंडचा राजपुत्र अमुक एका दिवशी सकाळच्या वेळीच बडोद्याच्या स्टेशनवर येणार आहे. तिथंच त्याची न्याहरी होणार आहे. त्याच्यासाठी दुधाची व्यवस्था व्हावी'

पंड्याजींनी हुकुमाची तामिली बरोबर केली. गायींचं स्वच्छ दुध, स्वच्छ सेवकांकडून तिथंच काढून राजपुत्राला दिलं. दुध दिलं आशि त्याचबरोबर दुधांचं बिलही दिलं. आणि सांगतात की, पंड्याजींनी ते वसूल देखील केलं !

पंड्याजींच्या धीटपणाचं कौतुक जाणकारांनी केलं. पण सरकारी वर्तुळात रागाची लाट उसळली. पंड्याजींनी त्या रागालाही भीक घातली नाही. म्हणाले "मी माझं कर्तव्य केलं. सरकारी गोशाळेचं दुध कोणाला मोफत देण्याचा मला काय अधिकार ?"

ब्रिटीशांच्या कडक, करड्या अमलात अशी गोष्ट करणाऱ्याची छाती तेवढाच निधडी असायला हवी. पंड्याजी अशा निधड्या छातीचे होते !

अशा निधड्या छातीचे होते म्हणूनच पंड्याजींनी नवसाच्या जंगलात बाँबगोळे बनवण्याची खटपट केली होती. त्याचं सगळं जालीम साहित्य जमवलं होतं. आणि त्याआधीच बाँबगोळे कसे तयार करायचे, यावरचं एक गुप्त पुस्तक वाचून ते गुजरातीत अनुवादिलं होतं. त्याच्या प्रती गुप्तपणानं, देशाच्या स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या गुप्त मंडळांच्या कडं पाठवल्या होत्या.

पंड्याजी फार चतुर आणि हुशार होते ! त्यांना ठाऊक होतं की कधी ना कधी तरी इंग्रजांच्या पोलिसांची नजर इकडं वळणार आणि पुस्तकं जप्त होणार, म्हणून पंड्याजींनी युक्तीच अशी करून ठेवली होती की, बाँबगोळ्याच्या पुस्तकाला एकच नाव न देता एकचत पुस्तक सात आठ नावांनी प्रसृत केलं होतं. पुस्तकांच्या काही प्रतींवर छापलं होते 'स्नानाचा साबण' काही प्रतींवर छापलं होतं 'औषधी वनस्पती' तर काही प्रतींवरचं मुखपृष्ठ होतं - 'औषधी वनस्पती', तर काही प्रतींवरचं मुखपृष्ठ होतं - 'नवरोझ ...' आणि अशी नावं असल्यामुळेच पंड्याजींनी एकदा यात्रेत ही पुस्तकं बेधडक विकली ! लोकांच्या हाती गेली.

पंड्याजींना मग चाकरीवर पाणी सोडणंच भाग पडलं. त्यांनी राजीनामा खरडला आणि क्रांती कारकांच्या गटात सामील झाले. पंड्याजी देशभक्त होते, स्वातंत्र्यनिष्ठ होते. इंग्रजांचं राज्य त्यांना खुपत होतं. ते हूसकून लावलं पाहिजे. नष्ट केलं पाहिजे आणि भारतमातेला स्वतंत्र केली पाहिजे, याचा त्यांनी ध्यासच घेतला होता. बडोद्यात त्याकाळी अशा ध्यासाची काही मंडळी पंड्याजींना भेटली होती. त्यांच्यासमेवत पंड्याजी क्रांतीचे धागेदोरे जुळवू लागले होते. बंगालमधल्या क्रांतीकारकांशी संधान बांधण्यात गुंतले होते.

परंतु तेवढ्यातच गांधीजी भेटले. पंड्याजींच्या हातातले बाँबगोळे गेले आणि चरखा - टकळी आली. पंड्याजी अहिंसक क्रांतीकारी बनले. गांधीजी म्हणाले होते, "माझी अहिंसा ही शूरविरांची आहे, भेकडांची नाही !" पंड्याजींच्या गावी भ्याड - भीती तर कधीच नव्हती. ते तर निर्भय - धैर्यवान होते !

एकदा दोन इंग्रज फलाटावर वर्तमानपत्र उघडून नजर टाकत होते. इंग्रज पाहिला की माणसं घाबरून लांबून जायची. समोर ठरायची नाहीत. अशी त्यांची दशा होती. पण पंड्याजी त्यांच्याजवळ गेले. दोघांच्यामधून पुढं आले. त्यांच्या हातातलं वर्तमानपत्र काढून घेतलं, ओझरती नजर टाकली आणि फलाटभर आनंदानं ओरडत सुटले, "गांधी छुट्या रे ऽ ऽ गांधी छुट्या," — "गांधीजी सुटले रे ऽ ऽ गांधीजी सुटले !"

असा हा बलदंड माणूस ! नीडर ! निर्भय ! म्हणूनच पंड्याजींच्या मागे खेडा जिल्ह्यातले गरीब किसान उभे राहिले. पंड्याजींनी साराबंदीची लढाई सुरू केली. सरकारी शिपायांना खेड्यापाड्यात सारा कुठला, प्यायला पाणीही मिळेनासे झाले. सरकार चिडले. दडपशाहीचा वरवंटा फिरवू लागले. पंड्याजींच्या पुढारीपणानं लोक प्रतिकाराला सिध्द झाले.

काही शेतकऱ्यांनी शेतात कांदे लावले होते. ते पावसापाण्याच्या माऱ्यातून थोडेफार कसेबसे वाचले होते. कांदे खांदणीला आले होते. पण सरकारनं शेतकऱ्यांवर हुकूम बजावला होता की, आधी सारा भरल्याशिवाय कांद्यांची खांदणी करायची नाही !

आधीच दुष्काळ ! त्यातून कसंबसं आलेलं कांद्यांच पीकही हातचं घालवायचं ? शेतकऱ्यांना अवघड झालं. ते पंड्याजींकडे गेले, त्यांची हालत ऐकून घेतली आणि पंड्याजी त्यांना म्हणाले, "तुमच्या शेतातले

कांदे तुमचे आहेत. बेलाशक खांदणी करा! सरकारचा हुकूम फाडून टाका!''

शेतकऱ्यांना धीर आला. पंड्याजी त्यांच्या शेताशेतांतून गेले. त्यांच्याबरोबर रातोरात खांदणी केली आणि कांदे ज्याच्या त्याच्या घरी पोचतेही झाले! याचा परिणाम व्हायचा तोच झाला. पंड्याजींना अटक झाली. त्यांना तुरुंगात डांबण्यात आलं. पंडयाजी मजेत गेले. तुरुंगाची हवा चाखत बसले.

गांधीजींना जेव्हा सगळं कळलं, तेव्हा ते हसत हसत म्हणाले, ''पंड्याजी तो डुंगळी चोर छ!''

आणि तेव्हापासून पंड्याजींना सगळा गुजरात 'डुंगळीचोर' म्हणूनच ओळखू लागला. डुंगळी म्हणजे कांदा. स्वातंत्र्याच्या लढ्यात पंड्याजींना गांधीजींकडून 'कांदेचोर' अशी जणू पदवीच मिळाली!

कांदे चोर पंड्याजींनी पुढं अनेकदा देशासाठी तुरुंगाची वारी केली. इंग्रज सरकारशी झुंज दिली!

● ● ●

# सुरस

गोष्ट आहे हजार एक वर्षापूर्वीची. काश्मीरच्या नंदनवनात घडलेली. पावसाळ्याचें दिवस होते. आभाळ फाटल्यानं पाऊस मुसळधार कोसळत होता. झेलम नदीला पूर आला होता. किनाऱ्यांची मर्यादा सोडून ती वाहात होती. 'वूलर' सरोवराचे पाणी भलतेच वाढले होते, फुगले होते. रानोमाळ पसरले होते.

काश्मीरच्या खोऱ्यात सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. शेतमळ्यांची तळी झाली होती. घरेदारे ढासळली होती. माणसे, जनावरे, हैराण झाली होती.

अवंतीवर्मा शूर, वीर तसाच दयाळू, प्रजाहितदक्ष राजा होता.

प्रजेचे हाल त्याला पाहवेनात. काय करावे याचे मार्गही सुचेनात. आभाळच फाटले होते. अस्मानी कोसळली होती.

आणि हे संकट दर पावसाळ्यात उभे राहू लागले होते. दरवर्षी अशी वाताहत चालली होती.

अवंतीवर्मा काहीही करायला तयार होता. पण काय करावे हेच कळत नव्हते. हताश झाला होता. अवंतीवर्माच नव्हे तर त्याचे सगळे हुशार पंडित, मंत्रीगण, विव्दान सल्लागार, चतुर मित्र कुणाचीच बुध्दी चालेनाशी झाली होती. सगळेच निराश, हताश बनले होते. उघड्या डोळ्यांनी काश्मीरच्या लावण्यभूमीचा विनाश पाहात होते.

'मग हे काश्मीरचे खोरे असेच पाण्यात बुडून जाणार तर!'

अवंतीवर्मा खोल सुस्कारा टाकून म्हणाला, खाली माना झालून दरबारी बसले होते.

'कुणालाच काही उपाय सापडत नाही? कुणीच काही सांगू शकत नाही?'

अवंतीवर्माने काकुळतीने विचारले. त्यावर एकजण म्हणाला,

'महाराज, आम्ही दुर्बल आहोत. आमची अक्कल दुबळी ठरली. काय करावे हे सांगणे आम्हाला कठीण झाले आहे पण..'

'बोला! पण काय? मोकळेपणाने बोला. काश्मीरवरची आपत्ती दूर करण्यासाठी जे काय दिव्य करावे

लागेल ते मी करायला तयार आहे. माझा खजिना त्यासाठी मोकळा आहे, माझे बाहुबल त्या कामी लावायला मी सिध्द आहे बोला !'

'महाराज, आपल्या नगरीत एक तरुण राहतो. सुरस त्याचं नाव.'

'सुरस !' राजासह सगळे दरबारी चकित होऊन उद्गारले. त्यात आश्चर्य होते. आणि तुच्छताही होती.

'काय करतो हा सुरस ? कोण आहे हा तरुण ?' राजाने विचारले.

एक मंत्री महाशय नाक उडवीत म्हणाले, 'महाराज सुरस एक मामुली, गरीब तरुण आहे. चार-सहा पोरं गोळा करुन त्यांना काही काही गोष्टी सांगत असतो. शिकवत असतो. कसं बस जगत असतो.'

''त्याची गरिबी आणि श्रीमंती याच्याशी आम्हाला काहीच कर्तव्य नाही. तो काय म्हणतो ते सांगा.''

''महाराज, तो आहे गरीब, पण फार हुशार आहे. मुलांना शिकवतो हे खरेच, पण गावातल्या लोकांजवळ म्हणत असतो की, हे पुराचे संकट मी लगेच दूर करू शकतो. ही आपत्ती थांबवू शकतो ''पण काय करणार, माझ्याजवळ ना पैसा ना कसली साधनं.''

''साधने तर आम्ही त्याला देऊ शकतो. पैसाही देऊ शकतो.'' राजा म्हणाला.

एका मंत्र्याने सल्ला देण्याच्या अविर्भावात सांगितले.

''महाराज, सुरसला साधनं नि पैसा पुरवणं म्हणजे नुकसान आहे, तो खुळा काय करणार आहे, ना त्याच्या आईबापाचा पत्ता, ना कुळगोत्राची माहिती.''

दुसरा तसल्याच तुच्छतेने सांगू लागला,

''असं ऐकलंय महाराज, की सुरस नावाच्या रस्ता झाडणाऱ्या एका बाईनं या सडकेवर सापडलेल्या मुलाला सांभाळलं आहे. मोठं केलं आहे.''

अवंतीवर्मा हे एकून रागावलाच. म्हणाला, 'तुम्हा लोकांचे डोकं फिरलंय की काय ! सुरसच्या जातीधर्मांशी मला काहीच देणंघेणं नाही. तो जर जलप्रलयापासून काश्मीरच्या धरतीला आणि माझ्या प्रजेला वाचवू शकत असेल, तर सुरस हा सर्वांहून श्रेष्ठ जातीचा आहे, असे मी मानीन ! सुरसला ताबडतोब दरबारात निमंत्रित करा !'

राजाची आज्ञा झाली. सुरस दरबारी उपस्थित झाला.

'सुरस तुझं नाव ?'

'होय महाराज'

'पुराचे संकट तू थोपवू शकतोस ?'

'होय महाराज. मला आवश्यक साधने दिली तर मी हे काम करून दाखवीन' सुरस आत्मविश्वासाने म्हणाला. राजाही प्रभावीत झाला. म्हणाला, 'खजिना तुझ्यासाठी मोकळा आहे. हव्या तेवढ्या सुवर्णमुद्रा घे!'

'ठीक आहे महाराज!' सुरस नम्रपणाने म्हणाला. मंत्रिराज मात्र चरफडले; कुजबुजू लागले.

''हा पोरटा काय करणार ?''

'पुराबरोबर ही नवी आपत्ती आणखी!'

'हा कारटा खजिना खलास करील!'

'मोठमोठ्या शहाण्यांनी जिथं हात टेकले, तिथं हा शूद्र काय दिवे लावणार ?'

सुरसच्या कानावर हे सगळे आलेच, पण तो काहीच बोलला नाही. खजिन्यातून सुवर्णमुद्रांनी भरलेल्या काही थैल्या घेऊन तो मुकाट्याने गेला. नदीच्या काठी आला.

काठावर बांधलेली नाव होती. थैल्या नावेत ठेवल्या आणि श्रीनगरच्या दक्षिणेला नावेतून निघाला.

जाता जाता मंडप राज्यातील नंदन नावाच्या ठिकाणी तो आला. तिथं त्याने सुवर्णमुद्रांनी भरलेल्या दोन थैल्या खोलल्या आणि नदीच्या प्रवाहात पसरून दिल्या.

काठावरच्या लोकांनी हे पाहिले. नदीच्या पाण्यात सुवर्णमुद्रा!

सुरसची नाव बारामुल्लाजवळ म्यारदत्र नावाच्या ठिकाणी पोचली. तिथंही त्याने दोन थैल्या पाण्यात पालथ्या केल्या.

सुरसच्या करणीची वार्ता सगळ्या खोऱ्यात पसरली. अवंतीवर्मालाही वाटले, 'सुरस खरचं खुळा तर नाही ?'

पाण्यात सुवर्णमुद्रा — ही वार्ता कळताच गोर-गरीब, भुकेकंगाल, पूरग्रस्त हजारो लोक झेलमकडे धावले. झेलमच्या प्रवाहातील सुवर्णमुद्रा मिळवण्यासाठी तिच्या प्रवाहात अडथळ्यासारखे असलेले खडक,

मोठाले दगड त्यांनी एकवटून बळाने दूर सारले. प्रवाह मोकळा केला.

झाले होते काय की, पावसाने दोन्ही बाजूंच्या डोंगरावरील मोठाले दगड, कडे कोसळून झेलमचा प्रवाह अडला होता. त्यामुळे झेलमचे पाणी उलट्या दिशेने जाऊन उलट सरोसराचे पाणी मर्यादेबाहेर वाढले होते.

सुवर्णमुद्रांच्या लालसेने हजारो लोकांनी ठिकठिकाणचे हे अडथळे बाजूला केले. प्रवाह वाहता झाला. उलट सरोवरातील पाणीही कमी झाले. संकट थोडे दूर झाले. लोकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. लोकांचा सुरसवर विश्वास बसू लागला.

'पाणी उतरले, पूर कमी झाला, पण काम संपलेले नाही. दरवर्षी पूराने होणारे नुकसान आपण कसे सोसणार? आपण सगळे जण जर असेच मिळून झटू तर पुराचे संकट कायमचे निपटून टाकू. सुखाने राहू.' सुरस लोकांना म्हणाला.

'हां हां जरूर झटू आणि हे संकट दूर करू!' लोकांनीही तयारी दाखवली. त्यांना त्यांच्यातील बळाची जाणीव सुरसने करून दिली होती.

झेलमचा प्रवाह रोखण्यासाठी एक मोठा बांध बांधण्याची योजना सुरसने सुरू केली.

त्या काळी नदीचा प्रवाह असा अडवला जाऊ शकतो हे स्वप्नातही कुणाला खरे वाटले नसते. पण हे स्वप्न सुरसने पाहिलेले होते.

लोकांनी पुष्कळ पुष्कळ कष्ट केले, रात्रंदिवस ते झटले आणि नदीचे पाणी बांध बांधून अडवून ठेवले.

मग सुरसने नदीचे पात्र खादून, गाळ काढून खोल करुन घेतले. डोंगराचे कडे कोसळून नदीचा प्रवाह अडू नये म्हणून नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर उंच तट बांधून घेतले.

रोखलेले पाणी नंतर धरणाच्या दरवाज्यातून मुक्त केले. झेलमचा प्रवाह मुक्तपणे खळाळत पुढे वाहू लागला. पण आता झेलमची कुणाला भीती उरली नव्हती. ती आपत्ती संपत्ती ठरली होती. ती संहारक न उरता उध्दारक, संजीवक बनली होती.

अवंतीवर्मा सुरसच्या अपूर्व कर्तबगारीवर प्रसन्न झाला. म्हणाला, 'तू तर काश्मीर खोऱ्याचे स्वरूपच बदलून टाकलेस! सुरस, मला तुझा अभिमान वाटतो. तुझ्या पुढच्या योजना सफल करण्यासाठी हवे तेवढे द्रव्य खजिन्यातून घे!'

सुरसने सर्वत्र हिंडून फिरुन काश्मीरचे खोरे न्याहाळले. झेलमचा संपूर्ण किनारा पाहिला.

ठिकठिकाणी पुराचे पाणी जाण्यासाठी कुठे दरवाजे, कुठे बांध तर कुठे पाट तयार केले. पण काश्मीर खोऱ्याच्या संरक्षणासाठी झेलम आणि सिंधू या नद्यांचे संगमस्थान बदलण्याची नितांत गरज आहे हे त्याच्या लक्षात आले. त्याने ही गोष्ट अवंतीवर्माला सांगितली. राजानेही ती योजना मान्य केली. खजिना खुला केला. सुरस त्या कामगिरीला लागला.

त्यावेळी बेगाव नावाच्या ठिकाणी डाव्याबाजूने सिंधू आणि उजव्या बाजूने झेलम नदी येऊन वन्यस्वामी मंदिराजवळ संगम होत होता. सुरसने नदी प्रवाहांना वळण देऊन तेथून ५ मैलांवर नेले आणि श्रीनगरजवळ शाहीपुरा येथे त्यांचा संगम घडवून आणला.

हे काम एवढे अभूतपूर्व होते की कल्हज कवीने उद्गार काढले, 'गारुडी जसा आपल्या मंत्राने सापाला वश करतो, तसा सुरस नदीचे प्रवाह आपल्याला हवेतसे डोलवतो !'

सुरसने ३०-३२ मैल लांबीचा दगडीबांध दोन्ही बाजूंनी बांधून झेलमचे पाणी वलर सरोवरात सोडण्याची व तेथून ते पाटाने बाहेर काढण्याची योजना पूर्ण केली.

सुरस म्हणाला, 'पूर-महापूर ही पुस्तकातून वाचण्याची किंवा सोडवण्याची गोष्ट नाही.'

अवंतीवर्मा म्हणाला, 'आमच्या भाग्याचे द्वारच सुरसने उघडले आहे.

लोक म्हणाले, 'सुरस आमचा अन्नदाता, परमेश्वरच आहे !'

सुरसची पूजा घरोघर होऊ लागली.

सुरसची ख्याती सर्वदूर पसरली.

सुरसने मात्र एक काम आणखी केले. जिने त्याला जवळ केले, सांभाळले, वाढवले, शिकवले, त्या सुरसला न विसरता त्याने 'सुरता-सेतू' नावाचा एक पूल बांधला आणि 'सुरसाकुंडल' नावाचे एक गाव वसविले.

खरोखर नद्यांना डोलवणारा, वळवणारा सुरस महान गारुडी होता. !

● ● ●



प्रकाशन विभाग
सूचना और प्रसारण मंत्रालय
भारत सरकार